कोषागारातून रोख देय अनुदान
राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जनजाती क्षेत्र उपयोजना (आदिवासी) या घटकासाठी केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याबाबत. (लेखाशिर्ष-२२१५ ९८५३).

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र.राग्रापे-२०१६/प्र.क्र.४४/पापु-१०
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णाल इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: २६.०३.२०१८

वाचा : १. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-७, दिनांक १७ मार्च, २०१०.
२. केंद्र शासनाचे पत्र क्र.W-११०२०/२०८/२०१५-वॉटर-१/२६४, दिनांक १७/०३/२०१७
३. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१६/प्र.क्र.०६/कार्यासन-६, दिनांक १२.०३.२०१८.

प्रस्तावना-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून अनुसूचित जनजाती क्षेत्र उपयोजना (आदिवासी उपयोजना) या अंतर्गत प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याच्या अनुदानासंदर्भात आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये मागणी क्र. टी-५, लेखाशिर्ष २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०९), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (केंद्र हिस्सा, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२१५ ९८५३) या लेखाशिर्षाखाली सन २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या निधीपैकी रु. १,०९,६७,०००/- (रुपये एक कोटी नऊ लक्ष सदुसष्ट हजार मात्र) एवढा निधी उपरोक्त (वाचा) संदर्भाधिन शासन निर्णय क्र. ३ अन्वये आदिवासी विकास विभागाने या विभागास अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे सुपूर्द केला आहे. सदर निधी अंमलबजावणी यंत्रणांना ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये नळ पाणी पुरवठा योजनांकरीता उपरोक्त घटकांसाठी २२१५ ९८५३ या लेखाशिर्षाखाली रु. १,०९,६७,०००/- कोटी (रुपये एक कोटी नऊ लक्ष सदुसष्ट हजार मात्र) एवढे अनुदान आदिवासी उपयोजनेंतर्गत रासायनिक बाधित (केमिकल कॅन्टॅमिनेशन) या घटकासाठी संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना वितरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वचछता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यात येत आहे.

अटी:-

(I) संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी हे अनुदान राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रासायनिक बाधित (केमिकल कॅन्टॅमिनेशन) या घटकासाठी आदिवासी उपयोजनेच्या निश्चित वार्षिक कृती आराखड्यात उपरोक्त घटकांसाठी समाविष्ट असलेल्या प्राथम्यक्रमानुसार येणाऱ्या तसेच ज्या केंद्रीय सहाय्यित योजनांमध्ये शासन सहभाग सक्तीचा करण्यात आलेला आहे अशा, भौतिकदृष्ट्या पूर्णत्वाकडे आलेल्या गावे/वाड्यांमधील योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी प्राथम्याने खर्च करण्यात यावे. तसेच सदर अनुदान भौतिकदृष्ट्या पूर्ण परंतू आर्थिकदृष्ट्या अपूर्ण गावे/वाड्या/फ्लोराईड/आर्सेनिक, संसद आदर्श ग्राम, हागणदारीमुक्त गावे/वाड्यातील योजना पूर्ण करण्यासाठी प्राथम्याने खर्च करण्यात यावे.

(II) संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी या अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत. या शासन निर्णयातील अटी व शर्तीची व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून पूर्तता होत आहे, याची शासनाला खात्री करून घेता यावी, यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर यांना तसेच या विभागातील प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना लेखा परीक्षणाकरिता संबंधित अंमलबजावणी यंत्रणांची पुस्तके व लेखे पाहण्याचा अधिकार राहील. तसेच

महालेखापाल यांना त्यांचे काम योग्यरितीने पार पाडता यावे म्हणून संबंधित अंमलबजावणी यंत्रणा संपूर्ण मदत व सुविधा पुरवतील.

(III) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र. आरसीएन-१८९/सीआर ३०२७/२८, दिनांक ०५/०९/९० मधील सुचनेप्रमाणे सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित दिनांकांना संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी विभागीय आयुक्त, (विकास शाखा), यांना व कार्यासन पापु-१०/पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करावे. त्याचप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर व पापु-१० कार्यासनास सादर करावे.

(IV) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रासायनिक बाधित (केमिकल कॅन्टॅमिनेशन) या घटकाखाली हाती घेतलेल्या योजनांसाठीचा खर्च हा ५०% केंद्र निधीतून व ५०% राज्य निधीतून करणे आवश्यक आहे.

(V) केंद्र व राज्य हिश्श्यातून केलेल्या खर्चाची नोंद न चुकता, IMIS या प्रणालीवर पुढीलप्रमाणे घेण्यात यावी तसेच सदर नोंदी पुढीलप्रमाणे वेळोवेळी अद्ययावत करण्यात याव्यात.

क. भौतिक दृष्ट्या १००% पूर्ण परंतू आर्थिक दृष्ट्या अपूर्ण योजना.
ख. > ७५ ते < १००% भौतिक दृष्ट्या पूर्ण.
ग. > ५० ते < ७५% भौतिक दृष्ट्या पूर्ण.
घ. > २५ ते < ५०% भौतिक दृष्ट्या पूर्ण.

(VI) तसेच BDS प्रणालीवर मुक्त केलेली रक्कम संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी त्वरीत संबंधित कोषागारातून काढण्याची कार्यवाही करावी. कोषागारातून रक्कम वेळीच न काढली गेल्यास तसेच सदर रक्कम या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी न वापरण्यात आल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांची राहील.

(VII) सर्वप्रथम, राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीमधून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी करण्यात आलेला सर्व खर्च प्रथम IMIS प्रणालीवर अद्यावत करण्यात यावा. जिल्ह्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार देयक तयार असलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी निधी मागणी असल्याने वितरीत करण्यात आलेला निधी सदर योजनांवरच खर्च करण्यात यावा. तसेच केंद्र हिश्श्यांतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी पाणी पुरवठा योजनांना वितरीत करतांना केंद्र शासनाच्या IMIS संकेतस्थळावर खर्चाची नोंद होत असल्याची खात्री करण्यात यावी.

(VIII) आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करून दिलेली सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७, या वर्षाच्या आदिवासी उपयोजनेच्या कृती आराखड्यात समाविष्ट असलेल्या गावांच्या योजनांसाठीच खर्च करावा. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लोकांकरिता खर्च करण्यात यावी. आदिवासी उपयोजनेंतर्गत केलेली तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर किंवा सर्वसाधारण योजनेखाली खर्च करण्यात येवू नये. उपयोगिता प्रमाणपत्र शासनास वेळीच सादर करावी.

२. सदर रक्कम रु. १,०९,६७,०००/- कोटी (रुपये एक कोटी नऊ लक्ष सदुसष्ट हजार मात्र) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा), (श्री. का. जा. धलपे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव (श्री. म. भ. सावंत), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा) (श्री. का. जा. धलपे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करून ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी. व तद्नंतर स्वतंत्र धनादेशान्वये सदर रक्कम पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी. पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर रक्कम केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच राज्य शासनाने या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार खर्च करावी.

३. यावर होणारा खर्च मागणी क्र. टी-५, लेखाशिर्ष २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०९), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (केंद्र हिस्सा), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२१५ ९८५३) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१६-१७ साठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र. बीयुडी-२०१७/प्र.क्र.०६/कार्यासन-६, १८ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये निधी वितरणाबाबत विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे. तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ३०/०६/२०१७ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभाग परिपत्रक दिनांक २०/०४/२०१७ मधील अनुक्रमांक ७ ते १८ मधील अटींची तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ ते ८ व क्र. ८ मधील तपासणी सूचीतील अनुक्रमांक १ ते १० मधील अटींची पुर्तता होत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक क्र. १४५/व्यय-३, दिनांक २०.०४.२०१७ व क्र. १६४/व्यय-१८, दिनांक ०२.०५.२०१७ च्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०३२६१५११२६०८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deelip Pandurang Patil

Digitally signed by Deelip Pandurang Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3810fd2c32f3841df60ca68a27ae50fdbc9fd6c506fd334325871d684bf3eef9, cn=Deelip Pandurang Patil
Date: 2018.03.26 15:13:37 +05'30'

(दिलीप पां. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
४. नियोजन विभाग (कार्यासन-१४४३)/वित्त विभाग (व्यय-३), मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
७. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
८. उप सचिव तथा नियंत्रक अधिकारी, पाणी पुरवठा व स्वचछता विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अवर सचिव तथा आहरण व संवितरण अधिकारी, पाणी पुरवठा व स्वचछता विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) जिल्हा परिषदां, सर्व
११. जिल्हा कोषागार अधिकारी,
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
१४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासने क्र. पापु-०४, पापु-२०.
१५. निवडनस्ती/पापु-१०